आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी – वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार, दिनांक : १५ मे, २०२४

ठळक बातम्या

1. पाचव्या टप्प्याच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नाशिक मध्ये प्रचार सभा संपन्न.

2. माजी कर्नल वैभव काळे यांना गाझा पट्टीत वीरमरण- पार्थिव भारतात आणण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयाचे प्रयत्न जारी.

3. नागपूर शहरातील होर्डिंग्सच्या सुरक्षेची खात्री पटविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज.

4.महाराष्ट्र कृषी पणन मंडळाचा 'आंबा, तृणधान्य व धान्य महोत्सव' उद्यापासून होणार सुरु.

मोदी सभा नाशिक+मोदी रोड शो

देशातील अल्पसंख्यांक समाजासाठी स्वतंत्र 15 टक्के तरतूद असणारा अर्थसंकल्प मांडण्याचा काँग्रेस पक्षाचा प्रयत्न होता मात्र भाजपान तो हाणून पाडला असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नाशिकमध्ये केलं. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार, डॉ.भारती पवार आणि नाशिक लोकसभा मतदार संघातील शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत इथं, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पार पडली त्यावेळी ते बोलत होते.

कांद्याच्या प्रश्नावर बोलताना नरेंद्र मोदी यांनी, कांदा उत्पादकांसाठी केंद्र सरकारन कांद्याचा बफर स्टॉक करण्याची योजना सुरु केली असल्याच सांगत, आता पर्यंत, सात लाख मेट्रिक टन कांदा शेतकऱ्यांकडून खरेदी केला असून पाच लाख मेट्रिक टन कांदा अजून ही खरेदी करायचा आहे असं ते म्हणाले.

सरकार कांद्यासह इतर पिकांसाठी ऑपरेशन ग्रीन राबवित असून कांद्याच्या वाहतुकीसाठी अनुदान दिलं जाईल असं ते म्हणाले.

या सभेला राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री, छगन भुजबळ, नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, उमेदवार डॉ.भारती पवार, हेमंत गोडसे यांची उपस्थिती होती.

पंतप्रधान आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज सायंकाळी घाटकोपर, मुंबई इथं रोड-शो करणार असून, घाटकोपर परिसरात पंतप्रधानांचा अडीच किलोमीटरचा रोड-शो, एल.बी.एस. मार्गावरील, श्रेयस सिनेमापासून सुरू होऊन, गांधी मार्केट इथं संपेल. तत्पूर्वी कल्याण इथ प्रचार सभेला नरेंद्र मोदी संबोधित करत आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांची नाशिक इथं आज रात्री आठ वाजता सभा होणार आहे. तत्पूर्वी सायंकाळी सात वाजता, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख, उद्धव ठाकरे यांची महाविकास आघाडीच्या उमेदवारासाठी सभा होणार आहे.

## निवडणूक तक्रारी

निवडणुकांच्या काळात राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सामाजिक भान जपत प्रचारातील भाषणांचा दर्जा चांगला राखून, आदर्श उदाहरण घालून द्यावं, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशाच्या सामाजिक सलोख्याला तडा जाऊ नये म्हणून निवडणूक प्रचार सभांची भाषा संयत ठेवणं ही प्रथमतः नेत्यांची जबाबदारी आहे, असंही आयोगानं म्हटलं आहे.

विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून दाखल झालेल्या आचार संहिता भंगाच्या, ४२५ ठळक तक्रारींपैकी ४०० तक्रारींवर आवश्यक कारवाई किंवा त्यांचं निराकरण करण्यात आलं आहे. यापैकी काँग्रेस आणि भाजपनं परस्परांच्या विरोधात दाखल केलेल्या काही तक्रारी प्रलंबित आहेत असं आयोगानं म्हटलं आहे.

कर्नल वैभव काळे / वीरमरण

भारतीय सैन्यातील माजी कर्नल वैभव काळे यांना गाझा पट्टीत रफाह इथं वीरमरण आलं. भारतीय सैन्यातून निवृत्त झाल्यानंतर ते संयुक्त राष्ट्र-अर्थात यूएनच्या सैन्यात प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते. त्यांचं शिक्षण नागपूर इथं झालं होतं.

कर्नल वैभव काळे सोमवारी एका कर्मचाऱ्यासह, यूएन फ्लॅग असलेल्या अधिकृत वाहनातून, रफाह येथील युरोपियन रुग्णालयात जात असताना झालेल्या हल्ल्यात शहीद झाले.

इस्रायल आणि हमास हल्ल्यातील हा पहिला आंतरराष्ट्रीय बळी मानला जात आहे. या व्यतिरिक्त, संयुक्त राष्ट्र संघातील आणखी एक कर्मचारी जखमी झाला असून, सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहे.

दरम्यान कर्नल वैभव काळे यांच्या दुर्दैवी मृत्यूबद्दल शोक व्यक्त करतांनाच, संयुक्त राष्ट्रांमधील कायम स्वरूपी मिशन तसंच, तेल अवीव आणि रामल्ला येथील मिशन काळे यांचं पार्थिव, भारतात परत आणण्यासाठी सर्व मदत करत आहेत आणि या घटनेच्या तपासासंदर्भात, संबंधित अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे असं, भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

एनएडीपी

राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी अर्थात एन.ए.डी.पी. नागपूरनं आपल्या प्रशिक्षणार्थी आणि विद्यार्थ्यांना दर्जेदार डिजिटल शिक्षण देऊ करण्यासाठी, Infosys सोबत सामंजस्य करार केला आहे.

या अंतर्गत Infosysच्या अद्ययावत स्प्रिंगबोर्ड लर्निंग प्लॅटफॉर्मवर या प्रशिक्षणार्थींना कौशल्य आत्मसात करता येणार आहे.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण उत्तर मध्य मुंबई लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. सायंकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

घाटकोपर दुर्घटना

मुंबईत घाटकोपरच्या छेडानगर इथं वादळी वाऱ्यामुळं कोसळलेल्या लोखंडी जाहिरात फलकाखाली अडकलेल्या गाड्या काढण्याचं काम बचाव पथकामार्फत आजही सुरू आहे. आज आणखी दोन मृतदेह बाहेर काढण्यात आले. महाकाय फलक कोसळल्यानं त्याखाली असलेल्या वाहनांमधून इंधन गळती होत आहे, तसंच कोसळलेल्या फलकामुळं पेट्रोल पंप प्रभावित झाल्यानं उपाययोजने साठीचे उपकरणं वापरण्यास अडचणी येत असून, फलक हटवण्यासाठी अवजड यंत्रांचा वापर केला जात असल्याचं, बचाव पथकाच्या सूत्रांनी सांगितलं.

सोमवारी झालेल्या या दुर्घटनेत १४ जण मरण पावले तर ४३ जखमींवर उपचार सुरु आहेत. दरम्यान, याप्रकरणी होर्डींग मालकावर गुन्हा दाखल झाला असून तो फरार आहे.

होर्डिंग

मुंबईमध्ये घडलेल्या घाटकोपर स्थित होर्डिंग दुर्घटनेनंतर नागपूर मनपातर्फे शहरात असलेल्या विविध ठिकाणच्या होर्डिंगचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. यासाठी मनपातर्फे दोन चमू तयार करण्यात आले असून त्या होर्डिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घेणार आहे.

याशिवाय जर अनुमती नसताना होर्डिंग उभारण्यात आल्याचे किंवा ते सुस्थितीत नसल्याचे आढळून आले तर संबंधित होर्डिंग मालकावर कारवाई करण्यात येणार आहे.

आगामी काही दिवस महानगरपालिकेची चमू, एक हजारांवर शहरातील होर्डिंगचे सर्वेक्षण करणार आहे.

आंबा, तृणधान्य, धान्य महोत्सव

नागपूर शहरात आंबा, तृणधान्य आणि धान्य महोत्सवाचं आयोजन, उद्या पासून अर्थात, १६ ते १९ मे दरम्यान करण्यात आलं आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळ विभागीय कार्यालयामार्फत, उत्तर अंबाझरी मार्गावरील कुसुमताई वानखेडे भवन इथं हा महोत्सव होणार आहे.

या महोत्सवामध्ये सहभागी उत्पादकांचे ४० ते ५० स्टॉल्स असणार आहेत, ज्याद्वारे उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात येईल. सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत प्रदर्शन आणि विक्री सुरू राहील.

## रोहीत्राची चाचणी

महावितरणच्या मौदा विभागा अंतर्गत असलेल्या, 33 बाय 11 किलो वॅट, अरोली उप-केंद्रातील पाच एम.व्ही.ए., रोहीत्राची क्षमतावाढ करुन ती, दहा मेगा वॅट इतकी करण्यात आली आहे.

कृषीपंप वीजजोडणी धोरण-2020च्या अन्वये, करण्यात आलेल्या या रोहीत्राच्या क्षमतावाढीमुळ, अरोली उप-केंद्रांतर्गत असलेल्या 40 गावातील शेतकरी तसच घरगुती ग्राहकांना, योग्य दाबाचा आणि शाश्वत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

## हवामान

गेल्या 24 तासात विदर्भात, ब्रह्मपुरी इथं सर्वाधिक 42.2 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. या पाठोपाठ अकोला इथं, 41.8 तर यवतमाळ इथं 41.7 इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

उष्माघातापासून बचाव करण्याच्या उपाययोजना स्थानिक प्रशासनातर्फे करण्यात आल्या आहेत. दरम्यान नागपुरात सकाळपासून ढगाळ वातावरण आहे.

हवामान खात्यानं व्यक्त केलेल्या अंदाजानुसार आज आणि उद्या नागपूरसह गोंदिया, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती आणि अकोला या जिल्ह्यात वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, गडचिरोली शहरासह जिल्ह्याच्या आरमोरी आणि धानोरा भागात आज संध्याकाळी मेघगर्जनेसह पावसाच्या हलक्या सरी बरसल्या.

## नवीन-प्रवेश प्रक्रिया

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्लीच्या, अमरावती इथल्या अभ्यास केंद्रा अंतर्गत, जुलै-2024 पासून सुरू होणाऱ्या विविध पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तर पदविका, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी नवीन-प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, नवीन प्रवेशाची अंतिम तारीख, 30 जून 2024 आहे.

सदर अभ्यासक्रमांकरिता इग्नोच्या, www.ignou.ac.in या वेबसाईटवरून अर्ज सादर करता येईल. सविस्तर माहिती पुस्तिका आणि ऑनलाईन अर्ज कसा सादर करावा याबाबतची माहिती, संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## वीज केंद्रात तोडफोड

वादळवाऱ्यामुळ वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्यान यवतमाळच्या बाभुळगाव उप-विभागातील, घारफळ उपकेंद्रात ग्रामस्थांनी आज तोडफोड केली. संतप्त गावकऱ्यांनी ऑपरेटरला देखील मारहाण करून त्याला बांधून ठेवलं.

काल बराच वेळ वीज नसल्यान संतप्त ग्रामस्थांनी हा हल्ला केल्याचं समजतं. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून जमावाला पांगविले.

दरम्यान, वीज कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांमुळे ते आंदोलनाच्या पावित्र्यात आहे अशी माहिती, आमच्या यवतमाळ प्रतिनिधीन दिली.

## बनावट कॉल

दुरसंचार विभाग किंवा ट्रायकडून मोबाईल सेवा खंडित करण्याचे इशारे देणारे कॉल बनावट आहेत. दूरसंचार विभाग किंवा ट्रायनं कोणालाही अशा प्रकारचे कॉल करण्याचे अधिकार दिलेले नाहीत असं, दूरसंचार मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

अशा कॉल संदर्भात, डब्ल्यू.डब्ल्यू.डब्ल्यू. डॉट संचारसाथी डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर, तक्रार नोंदवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. आपण सरकारी अधिकारी असल्याचं भासवणाऱ्या आणि लोकांना फसवणाऱ्या, परदेशी मूळस्थान असलेल्या मोबाईल क्रमांकांवरून येणाऱ्या व्हॉटसअॅप कॉलबाबतही दूरसंचार विभागानं एक नियमावली जारी केली आहे.